Shirish Kumar's Martyrdom Memorial is awe-inspiring in Nandurbar town. Also Shirish Kumar Udyan has been created in Nandurbar city in his memory.[15] During the Indian independence struggle, Mahatma Gandhi launched the Chalejaw Movement on August 8, 1942 to expel the British from India. On his one month anniversary on 9 September 1942, the students of Nandurbar's Municipal High School decided to take out a procession in his monthly memory. About three hundred students participated in this procession organized by Mr. Shirishkumar and his companions. Shirishkumar had the tricolor of the Indian flag. The procession took a violent turn from Municipal High School to Panjrapol and from there crossing the Mangal Police Gate to Manik Chowk when an agitator attacked Police Sub-Inspector Mr. Sheikh who was accompanying the procession with a knife on his right shoulder. Shirish Kumar Pushpendra Mehta, a boy of about 15 years of age, [16] also died among the five students who died in indiscriminate firing by the police this time. Along with him, Dhansukhlal Wani, Ghanshyam Das, Shashidhar Ketkar and Laldas also died at the same place. The firing case had a great effect on the people of Khandesh and the common people felt hatred towards the British government. A year after this incident, on September 9, 1943, a memorial day was observed at Nandurbar in memory of the children who lost their lives in firing. Later on 9th September 1945, Sana Guruji came to Nandurbar to celebrate Martyrdom Day, saluted the martyrs and held a huge meeting there in the evening and proposed a memorial for the martyrs at Nandurbar. The attendees accepted this suggestion and many people announced donations in the meeting itself. Accordingly Shirish Kumar Martyr Memorial was erected at Nandurbar. It is inspiring to all.[17]

**6. Sarangkheda**

At Sarangkheda in Shahada taluka there is a temple of Ekmukhi Datta of Mahanubhava sect and a fair is organized every year on Datta Jayanti. The horse market here is the special attraction of this fair and horse lovers from different parts of the country



Created by Universal Document Converter

bring their horses to this horse market. At this time horses are also bought and sold here.[18]

**Transportation System in Nandurbar District**

Nandurbar is a major town on the Ahmedabad-Howrah Western Railway route and is 401 km from the state capital Mumbai. Also Nandurbar city is connected with various cities of the country through railway lines. The Surat-Bhusawal route of the Western Railway from Nandurbar district passes through Navapur and Nandurbar talukas. Its length is 90 km and there are eleven other railway stations along with two major railway stations namely Nandurbar and Navapur.

Along with railways, national and state highways also pass through Nandurbar district. Also, the road network for internal transport in the district is also increasing. As on 31 March 2020, the total length of roads in the district is 7,487.19 km. Out of which, 65.55 percent are under Zilla Parishad, 29.12 percent under Public Works Department and 5.33 percent under municipal limits. The major state highway Barhanpur-Ankleshwar passes through Shahada Taloda and Akkalkuwa talukas from the district and the Surat-Nagpur national highway passes through Navapur taluka. According to the type of road surface in the district, 63.89 percent of the total roads are asphalt, 0.92 percent cement, 11.96 percent gravel and 23.23 percent other roads. per hundred sq. km by the end of March 31, 2020. The length of roads per area is 125.73 sq. km. That's it. Thus, out of total enumerated towns and villages in the district, 886 enumerated towns and villages are connected by perennial roads while 8 enumerated towns and villages are connected by eight-monthly roads.[19]

**Conclusion**

Nandurbar district has a rich cultural background and the region has seen many regimes like Hindu, Buddhist and Muslim as well as British rule. Also many evidences of ancient civilization have been found in this area. Therefore, the antiquity of Nandurbar is proved by archaeological evidence. Apart from this, a factor that adds to the social and cultural beauty of this nature-gifted region is the abode of the tribal community here. Nandurbar district is a special identity of the tribal people living in the hill slopes and valleys of the Satpuda Mountains. The tourist destinations of Nandurbar district are full of natural richness and are eager to give tourists a sense of the masterpiece of nature's beauty. Thus Nandurbar district situated in the north of Maharashtra is rich in many religious and tourist places.



Created by Universal Document Converter

# राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम अहवाल

**डॉ.अजय पी.नांद्रे**, रासेयो कार्यक्रम अधिकारी
**डॉ.कैलास बी.वाघ**, रासेयो सहा.कार्यक्रम अधिकारी
**डॉ.मनिषा उ. पाटील**, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी

१) दिनांक ५ जुन २०२३ राष्ट्रीय सेवा योजना विभाग याच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ जुन हिंदवी स्वराज्याची पताका अभिमानाने फडकवणारे महापराक्रमी, आराध्यदैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक दिना निमित्ताने प्रतिमा पुजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी साक्री तालुका विधायक समितिचे अध्यक्ष श्री.सुजन सोनवणे, म्हसदी महाविद्यालयाचे, कबचौउमवी येथील सिनेट सदस्य डॉ. ऋषीकेश चित्तम तसेच निवृत्त प्राध्यापक डॉ.सुर्यवंशी सर यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. या अतिथींच्या हस्ते राजे शिव छत्रपती यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी राजे शिव छत्रपती यांनी ६ जून १६७४ रोजी हे रयतेचे राजय शाश्वत, चिरंतन रहावे. म्हणून महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करून घेतला. याच दिवशी शिवाजी महराज छत्रपती झाले होते. परकीय आणि स्वकीयांबरोबर अशा जुलमी सत्ताधीशांशी, वतनदारांशी अनेक लढाया. युध्दे करून महाराष्ट्र भूमीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विजय देसले यांनी केले तर प्रास्ताविक डॉ.अजय नांद्रे यांनी केले. तर आीर डॉ.मनिषा पाटील यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

२) २१ जुन २०२३ रोजी रासेयो एककाच्या वतीने जागतिक योग दिवस महाविद्यालयातील प्रांगणात सकाळी ६ वाजेला साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी याग शिक्षक श्री. म्हसू सोनवणे, भदाणे येथील समाजिक कार्यकर्ते असून त्यांनी पतंजली योगपीठतर्फे प्रशिक्षण घेतले आहे. त्यांनी निमंत्रित केले होते. त्यांनी विविध योग प्रात्याक्षिके करून त्याचे महत्व विषद केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे हेही उपस्थित होते तसेच महा. शिक्षक व विद्यार्थी ही उपस्थित होते.

३) त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व.डॉ.भास्कर सदाशिव देसले यांच्या जयंती निमित्ताने महाविद्यालयाच्या माध्यमातून सप्ताह साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक २ ऑगस्ट रोजी मालपूर येथील राम नगरच्या डोंगरावर प्रती वर्षाप्रमाणे यावर्षीही वृक्ष लागवड व वृक्षांचा वाढ दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या सचिव आदरणीय श्रीमती डॉ.मंगलाताई देसले उपस्थित होते. त्यांनी डोंगरावर गतवर्षी झालेल्या वृक्षारोपणाची प्रथम पाहणी केली. व तेथील वृक्ष लागवड व संवर्धन झालेली प्रक्रिया पाहून व डोंगरावर सितसन इंडियाच्या माध्यमातून डोंगरावर पाणी पोचवण्याचे कार्य पाहून समाधान व्यक्त केले. त्याचप्रमाणे भविष्यात जर या डोंगरावर अर्थप्राप्ती होईल व स्थानिकांना रोजगार मिळेल अशा प्रकारचे वृक्ष



Created by Universal Document Converter

लागवड व संवर्धन करण्याचे याप्रसंगी आव्हान केले. व त्यानंतर मॅडमच्या दहा फूट उंचीचे दहा वडांच्या झाडांची लागवड करण्यात आली. त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे यांच्या हस्ते ही वृक्षारोपण करण्यात आले तसेच निसर्ग मित्र समितीचे क्रियाशील पदाधिकारी श्री.सुरेशभाऊ पारख हे ही प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. निसर्ग मित्र समितीचे सदस्य व सामाजिक कार्यकर्ते श्री.नंदलाल नांद्रे हेही उपिस्थत होते त्याचप्रमाणे महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य निसर्ग मित्र संस्था व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाचे कार्यक्रमाधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व महिला कार्यक्रमाधिकारी यांचे सहकार्य लाभले.

४) दिनांक ३ ऑगस्ट रोजी श्रीमती विमल उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.डॉ.बाबासाहेब भास्कर सदाशिव देसले यांच्या जयंती सप्ताह निमित्ताने आज ग्रामीण रूग्णालय साक्री व देसले हॉस्पिटल साक्री येथे फळ वाटप करण्यात आले. प्रतिवर्षी साक्री शासकीय रुग्णालय येथे फळ वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात येतो या कार्यक्रमासाठी संस्थेच्या सचिव आदरणीय श्रीमती डॉ.मंगलाताई देसले यांच्या हस्ते शासकीय रूग्णालयातील रूग्णांना फळ वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे शासकीय रूग्णालयाचे मुख्य डॉ.नांद्रे एस.पी.तसेय महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ.पी.एस.सोनवणे यांच्या शुभस्ते ही रूग्णांना फळ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. कैलास वाघ महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.मनिषा पाटील तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

५) दिनांक ४ ऑगस्ट रोजी श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.डॉ.बाबासाहेब भास्कर सदाशिव देसले यांच्या जयंती निमित्ताने सप्ताह साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून आज रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले होते. या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनासाठी संस्थेच्या सचिव आदरणीय श्रीमती डॉ.मंगलाताई देसले हया प्रमुख उद्घाटक म्हणून उपस्थित होते त्यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. या रक्तदान शिबिरासाठी धुळे येथून भाऊसाहेब हिरे शासकीय रूग्णालयातील रक्तपेढीस निमंत्रित करण्यात आले होते. त्यासाठी शासकीय रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.जयप्रकाश पुपुलवाड, श्री.चंदुलाल साठे, श्री.हेमंत देवरे व त्यांची संपूर्ण टीम उपस्थित होते. या रक्तदान शिबिरासाठी माहविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी तसेच देसले हॉस्पिटल मधील



Created by Universal Document Converter

कर्मचारी व परिसरातील रक्तदात्यांनी रक्तदान शिबिरात सहभाग घेतला. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी रक्तदान या महान कार्याचे महत्व स्पष्ट केले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मतदान करण्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती डॉ.मंगलाताई देसले यांनी आपले अध्यक्ष मनोगतात रक्तदानाबद्दल असणारे गैरसमज याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.अजय नांद्रे यांनी केले तर प्रास्ताविक सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.कैलास वाघ यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ.विजय देसले यांनी व्यक्त केला. या प्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

६) दिनांक ५ ऑगस्ट रोजी त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यांच्या ७४ व्या जयंतीनिमित्त आयोजित सप्ताहाचे समारोप कार्यक्रम संपन्न श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यलायात त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व.डॉ.भास्कर सदाशिव देसले यांच्या जयंती निमित्त आयोजित सप्ताह कार्यक्रमाचे समारोप साजरी करण्यात आली. यासाठी पोलीस निरिक्षक श्री.निकम साहेब प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते. तसेच या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जळगाव विद्यापीठाचे माजी व्यवस्थापक परिषद सदस्य व मा.प्राचार्य डॉ.बी.एस.देसले लाभले होते. संस्थेचे सचिव डॉ.मंगलाबाई देसले डॉ. गोसावी, डॉ.भदाणे सि.गो.पाटील महाविद्यालयाचे नॅक कोआर्डीनेटर डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यानिमित्ताने वेग वेगळया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे भास्करीय या नियतकालीकेचे उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते संपादन डॉ.कैलास वाघ यांनी प्रकाशन करून घेतले. त्यानंतर यशस्वी विद्यार्थी व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्राध्यापकांचे कौतुक मान्यवरांच्या हस्ते करण्यात क्रिडा विभाग समितीचे प्रा.अशोक भदाणे करून घेतले. तसेच महाविद्यालयाला दिल्लीच्या नॅक समितीकडून बी+ ही ग्रेड मिळाली त्यामुळे संसथेचे सचिव डॉ.मंगलाताई देसले यांनी सर्व कर्मचाऱ्यांचा सत्कार केल. त्यानंतर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यांच्या विषयीचे अनुभव डॉ.विजय देसले यांनी कथन केले. तसेच एनआयसी कॅम्प रेवाडी हरिणाणा येथे कु.सुवर्णा देसले या विद्यार्थी ने कॅम्प केला त्याविषयी व महाविद्यालयाने दिलेल्या संधीमुळे तिने मनोगत व्यक्त केले. तसेच डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण यांचाही या प्रसंगी सत्कार करण्यात आला व त्यांनी आपल्या मनोगतात सहकार्याची वृत्ती जोपसल्याने जिवनात सकारात्मक उर्जा निर्माण होते व ती प्रत्येकाला यशस्वी होण्यासाठी खूप फायदेशिर असते.

एपीआय श्री निकम साहेब सांनी विद्यार्थी दशेत औपचारिक–अनौपचारिक दोन्ही शिक्षणाचा मनापासून अभ्यासाचे सातत्य अतिशय महत्वाचे आहे. अनेक सामान्य विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाले आहेत. कारण अभ्यासातील सातत्य व शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे. आदरणीय श्रीमती डॉ.मंगलाताई



Created by Universal Document Converter

देसले यांनी संस्थापक अध्यक्ष स्व.बाबासाहेब देसले यांनी केवळ विद्यार्थी हित लक्षात घेऊन संस्थेची स्थापना केली होती. आणि हे धोरणे होते. म्हणूनच विविध नाविन्यपूर्ण विषय महाविद्यालयात सुरू करण्यात आलेले होते.

७) दिनांक ९ ऑगस्ट रोजी श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्ताने मेरी माटी मेरा देश हा उपक्रम शासनाच्या व विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार साजरा करण्यात आला. प्रथम क्रांती दिवस शहिदांना नमन करून भगतसिंग यांच्या प्रतिमेचे व जागतिक आदिवासी दिनामित्ताने बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ.पी.एस.सोनवणे हे होते. त्यांनी आपलया अध्यक्ष मनोगतात क्रांती दिवसा निमित्ताने स्वातंत्र्य चळवळीतील स्वातंत्र्यवीरांचे योगदान याविषयी तसेच जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने आदिवासी बांधवांना शुभेच्छा देऊन आदिवासी साहित्य कला संस्कृती निसर्ग इ. परंपरागत वारसा जोपासण्याचे महान कार्य गेल्या अनेक शतकापासून होत आहे. याविषयीचे त्याचे महत्व स्पष्ट केले व मेरी माटी मेरा देश या उपक्रमांतर्गत जलस्रोत संवर्धन, पंचप्राणांची शपथ, वसुंधरा वंदन, स्वातंत्र्यवीरांना नमन ध्वजारोहण राष्ट्रगान इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन देश हितासाठी गरजेचे असल्याने हे राबविले जात आहे. यासाठी सर्वच विद्यार्थ्यांनी वर्षभर राबवल्या जाणाऱ्या या कार्यक्रमामध्ये सक्रिय सहभाग नोंदवल्या विषयी आव्हान केले. त्यांनतर उपस्थित सर्वांनी पंचप्राण शपथ व सेल्फी घेतली.

८) दिनांक ९ ऑगस्ट रोजी श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदस्यदिसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्ताने मेरी माटी मेरा देश हा उपक्रम शासनाच्या व विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या परिपत्रकानुसार साजरा करण्यात आला. यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने दत्तमक घेतलेल्या मालपूर येथील रामनगर डोंगरावर आदिवासी बांधवांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी शहिदांना नमन करून जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासींचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी मौजे मालपूर गावातील ग्रामसेवक श्री.सुशांत सोनवणे माजी सरपंच व शेतकीसंघ संचालक श्री.नैनेश भामरे पंचायत समिती सदस्य प्रतिनीधी व माजी सरपंच श्री पंकज भामरे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवा नेते व माजी सरपंच श्री सचिव सोनवणे, श्री.रमेश शिंदे, श्री.कैलास जाधव, श्री.बंडू काकुस्ते, मा.ग्रामपंचायत सदस्य श्री.भास्कर भिल मा ग्रामपंचायत सदस्य श्री.संजय भिल, गणेश जाधव तसेच मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी पंचप्रण शपथ अजय नांद्रे यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अभिजित भामरे यांनी केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक,



Created by Universal Document Converter

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.अजय नांद्रे यांनी केले तर अभार राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ.कैलास वाघ यांनी मानले या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व मालपूर ग्रामस्थ माजी विद्यार्थी उपस्थित होते.

९) दिनांक ५ सप्टेंबर रोजी श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने भारताचे पहिले उपराष्ट्रपती व दुसरे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्ताने शिक्षक दिन साजरा केला जाते. त्या अनुषंगाने त्यांच्या प्रतिमेचे पूजन व त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य पी.एस.सोनवणे यांनी सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतीक कार्याचा आलेख आपल्या मनोगतात स्पष्ट केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्श्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.अजय नांद्रे यांनी केले तर प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ.कैलास वाघ यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ.विजय देसले यांनी मानले. या कार्यक्रमासाठी माहविद्यालयातील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

१०) दिनांक ६ सप्टेंबर रोजी श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाचे शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मधील उद्घाटन झाले, या उद्घटनासाठी प्रमुख उद्घाटक म्हणून कबचौउमवि जळगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ.सचिन नांद्रे उपस्थित होते. दिनांक ०५ सप्टेंबर रोजी रोटरी क्लब या सामाजिक संस्थेच्या वतीने डॉ.सचिन नांद्रे यांना शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात असलेले उत्तम कार्यामुळे नेशन बिल्ड अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले म्हणून त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनाही शिक्षक दिनांच्या औचित्य साधुन निसर्ग मित्र संस्थेच्या वतीने राज्यातील आदर्श प्राचार्य म्हणून पुरस्कार देण्यात आला त्या निमित्ताने सर्व शिक्षकांच्या वतीने त्यांचाही सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमाच्या प्रसंगी सुरूवातीला मेरी माटी मरो देश या उपक्रमांगर्तत अमृत कलश ठेवण्यात आला होता व  प्रमुख अतिथीच्या उपस्थितीत या कलशात उपस्थिती एक मुठ माती विथ सेल्फी घेत कार्यक्रमाला सुरूवात केली. उद्यापासून सर्व विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात परिसरात हा कलश ठेवण्यात येईल व तेथे सर्व  विद्यार्थ्यांना कार्यक्रमाप्रसंगी केलेल्या आव्हानानुसार आपपल्या गावातून माती आणून या काळसात टाकतील. या कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.सचिन नांद्र यांनी आपलया उद्घाटनपर मनोगतात जीवनात यशस्वी आदर्श व्यक्ती जर व्हायचे असेल तर राष्ट्रीय सेवा योजना एककात सहभागी होणे



Created by Universal Document Converter

आवश्यक होणे आवश्यक आहे. देशात केंद्रत्यागी शक्ती निर्माण करण्यासाठी रासोयोजी काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण विकसित करण्यासाठी हे अतिशय उत्तम व्यासपीठ आहे या एककातून जीवनात विविध साध्य करता येतात व आपल्या केलेल्या कार्याची दखल घेत आपल्याला वेगवेगळया पातळ्यांवर सन्मानित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. साकारात्मक ऊर्जा निर्माण करण्यासाठी हे एकक अतिशय फायदेशीर आहे दहा गुण मिळतात यासाठी नाही तर समाजात चांगलं व्यक्तिमत्व निर्माण करण्यासाठी हे एकक अतिशय फायदेशीर आहे दहा गुण मिळातात यासाठी नाही तर समाजात चांगलं व्यक्तिमत्व निर्माण होण्यासाठी सहभागी व्हा असे आव्हान त्यांनी केले.

यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी आपला अध्यक्ष मनोगतात जो जीवनात आलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे फायदे व विद्यार्थ्यांसाठी भविष्यात असणाऱ्या विविध उत्तम संधी तसेच वेगवेगळ्या पुरस्कार व सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे व्यासपीठ अतिशय उत्तम संधी असून या संधीचे सोने करण्याचे आव्हान मा.प्राचार्यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ.कैलास वाघ यांनी केले तर प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.अजय नांद्रे यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.मनिषा पाटील यांनी केले.

११) राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थीनीच्या आयोजनाने भव्य नेत्रदान शिबिर संपन्न दिनांक १०-९-२०२३ रोजी रविवार साकळी दहा वाजता बालाजी मंगल कार्यालय कासारे येथे श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय साक्री येथील राष्ट्रीय सेवा योजना एकक तसेच प्रवासी महासंघ आणि कांता लक्ष्मी शहा नेत्रालय नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत डोळे तपासणी व मोतीबिंदू ऑपरेशन शिबिर संपन्न.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना एककाची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील आदर्श विद्यार्थीनी कु.सुवर्णा भालचंद्र देसले या विद्यार्थ्यांनी साक्री तालुका प्रवासी महासंघाचे अध्यक्ष उद्योजक श्री.सुरेशभाऊ पारख यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करून यशस्वीरित्या संपन्न केला.

सदर शिबिरासाठी प्रमुख उद्घाटक म्हणून श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उद्योजक श्री.सुरेशभाऊ पारख यांनी भूषवले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून निसर्ग मित्र धुळे जिल्हा उपाध्यक्ष श्री.विलास देसले, लोकमतचे तालुका प्रतिनिधी श्री.विद्यानंद पाटील, श्री.सुहास सोनवणे, प्राचार्य श्री.बी.एम.भामरे, कार्यक्रमाधिकारी डॉ.अजय नांद्रे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.मनिषा पाटील उपस्थित होते.



Created by Universal Document Converter

सर्व प्रथम या शिबिरासाठी कांतालक्ष्मी शहा नेत्रालयातील डॉ.गुणवंत कोळी यांनी उपस्थित सर्व रूग्णांना डोळ्याची तपासणी व ऑपरेशनची गरज याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य पी.एस.सोनवणे यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात हॉस्पिटलच्या सामाजिक कार्याविषयी तसेच उद्योजक श्री.सुरेश पारख यांनी आजपर्यंत शेकडो नेत्र तपासणी व मोती बिंदू ऑपरेशन शिबिराच्या आयोजक केले. म्हणून त्यांच्या कार्याला सलाम करत. सामान्य जनतेच्या तुलनेने ही अविरत चालणारी प्रक्रिया खूपच समाधान देणारी आणि आणि डोळे अतिशय सनमोल संपत्ती असून तिची काळजी घेण्यासाठी आजच्या शिबिराचे आयोजक कु.सुवर्णा देसले ही श्री.सुरेश भाऊंच्या मार्गदर्शनात छान असे आयोजन केलेले आहे. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.सुरेशभाऊ पारख यांनी आपल्या अध्यक्ष मनोगतात सुवर्णा करत असलेले कार्य लक्षात घेऊन तिला आजच्या कार्यक्रमाच्या आयोजक केलेले मला या सामाजिक कार्यात मनस्वी आनंद होतो व जेव्हा ऑपरेशन करून रूग्ण आपला आनंद व्यक्त करण्यासाठी प्रत्यक्ष भेटायला येतात त्यावेळेस त्यांचा आनंद पाहून माझा ही आनंद होत असल्याचे मत व्यक्त केले. आजपर्यंत हजारो रूग्णांना सेवा देण्यात संधी मिळाली. आज १०० पेक्षा जास्त रूग्ण नेत्र तपासणीसाठी उपस्थित आहेत व प्रत्येक शिबिरात अशाच प्रकारचा प्रतिसाद जनतेचा असतो म्हणूनच यापुढेही असेच कार्य अविरत सुरू राहील असे आवश्वासन व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु.सुवर्णा भालचंद्र देसले हिने केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.विलास देसले यांनी केले कार्यक्रमाचे आभार श्री.सुहासभाऊ सोनवणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिक्षक व स्वयंसेवक विद्यार्भि यांनी विशेष प्रयत्न घेतले.

१२) दिनांक १६ सप्टेंबर २०२३ रोजी रासेयो आणि भूगोल विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिनानिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन. या कार्यक्रमासाठी माहविद्यालयातील प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्ष होते. तर प्रमुख वक्ते भूगोल विभाग प्रमुख डॉ.अजय नांद्रे होते. या कार्यक्रमाप्रसंगी अजय नांद्रे यांनी ओझोन दिवस साजरा करण्यात विषयीची पार्श्वभूमी व्यक्त केली तसेच ओझोनचे महत्व ओझोन क्षयाचे परिणाम याविषयी मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्ष भाषणात प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी ओझोन जीवनरक्षक वायू म्हणून कसं कार्य वातावरणात चालते व प्रखर किरणांना पृथ्वीकडे योण्यापासून संरक्षण कशाप्रमाणे निर्माण होते. याविषयी माहिती दिली म्हणून वातावरणातील ओझोनचे प्रमाण अवाधित राखण्यासाठी जनसामान्यांपर्यंत ओझोन विषयी माहिती पोहोचणे अवश्यक आहे. व जनजागृती निमर्णाण अबाधित राखण्यासाठी जनसामान्यांपर्यंत ओझोन विषयी माहिती पोहोचणे आवश्यक आहे व जनजागृती निर्माण करून पृथ्वीवरील पर्यावरण सुरक्षित ठेवण्यासाठी मानवाची भूमिका महत्वपूर्ण असल्याने येणाऱ्या पिढीपर्यंत याची माहिती



Created by Universal Document Converter

पोहोचवण्याच्या हेतूने असे दिवस साजरे केले जातात.

१३) श्रीमती विमलबाई पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला दिनांक २५ सप्टेंबर रोजी त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिवसा निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य पी.एस.सोनवणे उपस्थित होते. प्रमुख व्याख्याते म्हणून सि.गो.पाटील महाविद्यालयातील मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना तालुका समन्वय डॉ.विश्वास भामरे लाभले होते.

डॉ.विश्वास भामरे यांनी आपल्या मनोगतात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व विविध उदाहरण देऊन विशद केलं. तसेच जीवनात खऱ्या अर्थाने यशस्वी व्यक्तिमत्व म्हणून जीवन जगायचे असेल तर राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका परिवर्तनशील असल्याने विद्यार्थी जीवनात मिळालेले संधीचे सोन करण्याचे आव्हान याप्रसंगी केले.

१४) दिनांक १ ऑक्टोंबर २०२३ रोजी त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील रात्री सेवा योजना एकक,विद्यार्थी विकास व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष मनोगतात महात्मा गांधी यांनी स्वच्छता अभियान एक देशव्यापी चळवळ उभ केली होती. तसेच त्यांच्या कार्य गौरव विषयी सविस्तर अशी माहिती आपल्या मनोगतात दिली. त्यानंतर स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महाविद्यालय परिसारात स्वच्छता अभियान सकाळी १० ते ११ या वेळेत भारताचे पंतप्रधान आदरणीय श्री.नरेंद्र मोदी यांच्या आव्हानानुसार राबवले. या उपक्रमाप्रसंगी स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे गुण अंगीकारून समाजात वावरत असताना स्वच्छता दूत म्हणून संदेश व कार्य करण्याचे आव्हान प्राचार्य महोदयांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.अजय नांद्रे यांनी केले तर प्रास्ताविक सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ.कैलास वाघ यांनी केले.

१५) दिनांक १३ ऑक्टोंबर रोजी त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीयसेवा योजना एकाच्यावती विविध उप्रकमाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककाच्या वतीने मौजे मालपूर रामनगर या दत्तम गावात एका दिवशी शिबिराचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून कबचौउमवि जळगाव



Created by Universal Document Converter

येथील राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ.सचिन नांद्रे यांना प्रमुख उद्घाटक म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. तसेच पिंपळनेर वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.डी.आर.आडकिने हे प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.पी.एस.सोनवणे होते. मेरी माटी मेरा देश अभियानांतर्गत महाविद्यालयात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या गावातून एक मूठ माती आणून अमृत कलश यामध्ये सेल्फी विथ मिट्टी बरोबर ती माती अमृत कलश यामध्ये टाकायची होती या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार संकलित झालेली मातीतिल काही मातीचा दत्तम गावात अमृत उद्यान तयार करण्यासाठी वापर करायचे धोरण होते. त्यानुसार आज महाविद्यालयातील दत्तम गावात अमृत वाटिका तयार करण्यात आली व त्यात ७५ वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाबरोबर पिंपळनेर वनविभाग व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने वन्यप्राणी सप्ताह साजरा करण्यात आला तसेच दत्तक गावात स्वच्छता अभियान ही राबवण्यात आले तसेच दत्तम गावात भव्य जनजागृती पर रॅली आयोजित करण्यात आली होती असे वेगवेगळे कार्यक्रम या एक दिवशीय शिबिरानिमित्ताने आयोजित करण्यात आले होते.

१६) दिनांक ३१ ऑक्टोंबर रोजी श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील व कै.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने दिनांक ३१ ऑक्टोंबर हा दिवस सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व माजी प्रंतपधान स्वर्गीय इंदिरा गाधी यांचे पुण्यतिथी साजरा करण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे होते तर प्रमुख वक्ते म्हणून निजामपूर महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ.रवी ठाकरे लाभ होते.

१७) दिनांक २ डिसेंबर रोजी त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने एक डिसेंबर एड्स दिवस कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे होते तर प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय सेवा योजना माजी विभागिय समन्वयक डॉ.सतिष म्हस्के (पिंपळनेर महा.) लाभले होते. डॉ.म्हस्के यांनी आपल्या प्रमुख मनोगतात बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या जीवन कार्यात अनमोल शब्दांचे माळ गुंफून समाज प्रबोधनाचे खूप मोठे कार्य त्या माध्यमातून केलेले. पाहायल मिळते म्हणून विद्यार्थी मित्रांनो त्यांचे विचार लक्षात घेऊन जर जीवनात कृतीत आणले तर निश्चितच आपणार यशस्वी होण्यासाठी फायदेशीर ठरतील म्हणून त्यांच्या जीवनकार्याचा आढावा एक तासाच्या भाषणातून घेता येणार नाही. म्हणून त्यांचे प्रत्यक्ष वाचनातून जाणून घेतले जर अधिक उपयोगी होईल. म्हणून त्यांच्यावरील पुस्तके अभ्यासाचे आव्हान याप्रसंगी केले. तर प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे



Created by Universal Document Converter

यांनी सर्व प्रथम १ डिसे. जागतिक एड्स दिनानिमित्ताने दरवर्षी मोठ्या प्रमाणात जनजागृतीचे कार्यक्रम जगात राबविले जातात व  त्यामुळेच वर्तमान स्थिती या मानवी आपत्तीवर नियंत्रण मिळविण्यात निश्चितच यश कलाभले आहे तरी  अद्याप पुर्णपणे या आपत्तीचे समुळ उच्चाटन करण्यासाठी जनजागृती गरजेचे आहे. म्हणून राहून तारूण्यात आपल्या आरोग्याकडे लक्ष देण्याचे आव्हान केले. तसचे कवयित्री बहिणाबाई चौधरी याची पुण्यतिथी त्या निमिताने त्याच्या जीवनकार्याविषयी आपल विचार व्यक्त केले. शिक्षणाच्या दृष्टीने अशिक्षित होत्या मात्र विचाराच्या दृष्टीने खुप ज्ञानी होत्या असे त्यांच्या कवितांतुन लक्षात येते. म्हणून समाज प्रबोधक म्हणून बहिणाबाई कार्य केले व आपल्या परिवारातील वृध्द व्यक्तीच्या मुखातुन जी शब्दाची माळ बाहेर पडते ते संकलीत करण्याचे आव्हान रासेयो स्वयम सेवकांनी केलेत.

१८) दिनांक ६ डिसेंबर रोजी त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने ६ डिसेंबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे होते तर प्रमुख वक्ते म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ.विजय देसले हे होते.

१९)  राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विमलबाई महा. कार्यक्रम संपन्न दिनांक १२ जानेवारी रोजी त्रिमूर्ती शिक्षण संसथे श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने राष्ट्रीय युवा दिन आणि राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.अजय नांद्रे होते तर प्रमुख वक्ते म्हणून साक्री शासकीय रूग्णालयातील डॉ.योगेश नांद्रे लाभले होते. डॉ.योगेश नांद्रे यांनी आपल्या प्रमुख मनोगतात युवकांना आरोग्य संपन्नता राखण्यासाठी प्रयत्नशिल राहण्याचे अव्हान केले यासाठी विद्यार्थ्यांना आरोग्य संपन्नतेसाठी शपथ दिली. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अजय नांद्रे यांनी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्या निमित्ताने त्यांच्या जिवनकार्याविषयी आपले विचार व्यक्त केले.

२०) दिनांक ८ मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिवस रासेयो विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ.कैलास वाघ यांनी केले. प्रास्ताविक डॉ.अभिजित भामरे यांनी केले. तर महिला दिनानिमित्ताने विकसित भारत निर्माण करण्यासाठी युवतींचे योगदान या विषयावर रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.अजय नांद्रे मार्गदर्शन केले.



Created by Universal Document Converter

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर अहवाल

**डॉ.अजय पी.नांद्रे**,रासेयो कार्यक्रम अधिकारी
**डॉ.कैलास बी.वाघ**,रासेयो सहा.कार्यक्रम अधिकारी
**डॉ.मनिषा पाटील**,रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी

त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने दि.२५ जानेवारी २०२४ रोजी विशेष हिवाळी श्रीमसंस्कार शिबिराचे उद्घटान मौजे मालपूर येथील रामनगर या आदिवासी वस्तीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक मा.श्री.संजय सूर्यवंशी (पोलीस निरीक्षक) तसेच माजी श्री.मोतीलाल अहिरराव यांच्या हस्ते झाले तर प्रमुख अतिथी म्हणून त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे विद्यापीठाचे माजी उपकुलसचिव श्री.टी.एल.बोरसे सरपंच सौ.घमाबाई भिल, माजी सरपंच नैनेश भामरे, माजी सरपंच पंकज भामरे ग्रामसेवक सुशांत सोनवणे इत्यादी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडला.

दिनांक २६ जानेवारी रोजी या शिबिरात वैचारिक प्रबोधन प्रथम सत्रसाठी दहिवेल महाविद्यालयातील प्रा.डॉ.वंदना पाटील यांनी स्त्रीशक्ती आणि समाज याा विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या वैचारिक सत्रासाठी साक्री महाविद्यालयातील डॉ.निलेश मालीचकर यांनी शाश्वत विकास आणि युवक या विषयावर मार्गदर्शन केले. दिनांक २७ जानेवारी रोजी वैचारिक प्रबोधनासाठी प्रथम सत्रात श्री.अनिल सूर्यवंशी (माजी मेजर सुभेदार) यांनी आपत्ती व्यवस्थापन व आर्मी सर्व्हिसेस या विषयावर मार्गदर्शन केले तर दुसरा सत्रात डॉ.दिनेश माळी यांनी २१ व्या शतकातील युध्दाचे बदलते स्वरूप या विषयावर प्रबोधन केले.

दिनांक २८ जानेवारी रोजी प्रथम सत्रात डॉ.प्रतिभा चौरे यांनी देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासात युवकांचे योगदान या विषयावर वैचारिक प्रबोधन केले. दुसऱ्या सत्रात डॉ.अभिजित भामरे यांनी स्त्रियांच्या समस्या या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक २८ जानेवारी रोजी प्रथम सत्रात श्री.अमोल देवरे (मॅनेजर, इंडिया बँक साक्री) यांनी युवकांसाठी बँकिंग योजना याविषयी सविस्तर माहिती दिली तर द्वितीय सत्रात साक्री तालुका सिकलसेल समुपदेश डॉ.कांतीलाल चव्हाण यांनी सिकलसेल या आजाराविषयी जनजागृती केली. तसेच सायंकाळी साक्री आरोग्य विभागातील डॉ.योगेश नांद्रे यांनी शिबीरात मार्गदर्शन करण्यासाठी प्राचार्यांची विशेष परवानगी घेऊन एच.आय.व्ही.या विषयावर मार्गदर्शन केले.

दिनांक २९ जानेवारी रोजी प्रथम सत्रात डॉ.विश्वास भामरे, रासेयो विभागीय समन्वयक, सि.गो.पाटील महाविद्यालय साक्री यांनी नवीन शैक्षणिक धोरणे आणि अव्हाने या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच बौध्दिक सत्राचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर या आदिवासी वस्तीतील लोकांना मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली.

शिबिराचा समारोप दिनांक ३१ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आला. या कार्यक्रमाच्या समारोप कर्ते डॉ.हेमत पाटील रासेयो धुळे जिल्हा समन्वयक, डॉ.विश्वास भामरे, रासेयो साक्री तालुका विभागीय समन्वयक प्रमुख अतिथी श्री पंकज भामरे माजी सरपंच मालपूर हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य पी.एस.सोनवणे होते. डॉ.हेमंत पाटील रासेयो धुळे जिल्हा समन्वयक, यांनी आपल्या मनोगतात, या प्रसंगी



Created by Universal Document Converter

विद्यार्थ्यांनी जे मत व्यक्त केले त्यावरून शिबिर यशस्वी झाल्याचे लक्षात आल्याचे मत व्यक्त केले. व या शिबिराच्या माध्यमातून जे विविध प्रकारचे संस्कार टाकले गेले त्याचा समाज उपयोगी वापर करण्याचे आव्हान केले. डॉ.विश्वास भामरे, रासेयो साक्री तालुका विभागीय समन्वयक यांनी मी स्वतः राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर केलेले आहे व त्याचा फायदा झाल्यामुळे मी जीवनात यशस्वी व्यक्ती म्हणून सन्मानित होत असल्याचे मत व्यक्त केले. तसेच आपल्या आवडीच्या क्षेत्राकडे विद्यार्थ्यांना आकर्षित होण्याविषयी आव्हान केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी अध्यक्ष मनोगतात शिबिर अतिशय यशस्वी झाल्याचे मत व्यक्त केले कारण या शिबिरात दररोज भेट देऊन शिबिराचा उद्देश सफलहोत की नाही या विषयी माहिती इतारांकडून घेणे सुरू होते म्हणून अतिशय प्रामाणिक पणे हे शिबिर होत असल्याचे मत मला ऐकायला मिळाले म्हणून या यशस्वी ते मागे विद्यार्थ्यांचे कार्य महत्वपूर्ण आहे आणि यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व जीवन जगत असताना स्वार्थी वृत्ती बाजूला ठेवून समाजोपयोगी कार्यक करण्याचे आव्हान केले व अनेक यशस्वी सामाजिक कार्यकर्त्यांचे उदाहरण देन भविष्यातील उत्तम सामाजिक कार्यकरणाविषयी आव्हान केले.

या कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.अजय नांद्रे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.कैलास वाघ महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.मनिषा पाटील तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री.किसन सूर्यवंशी तसेच सामाजिक कार्यकर्ते जयेश सोनवणे यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. तसेच या शिबिरासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी व मालपूर ग्रामस्थांनी विशेष सहकार्य केले. या शिबिरात दैनदिन रूपरेषा खालील प्रमाणे होती. त्याप्रमाणे दररोज नियोजन केले जात होते. या दत्तक गावात रामनगर येथील डोंगरावर वृक्षारोपण, मुदासंवर्धन, जलसंवर्धन, स्वच्छता, प्लास्टीक मुक्ती अभियान, मतदार जनजागृती इ. विविध प्रकारचे उपक्रम आमच्या एककाच्या वतीने राबविण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| सकाळी | : | ५.०० ते ६.५५ | जागर, योगा चहा-अल्पोहार |
| | | ७.०० ते ११.०० | श्रमदान |
| | | ११.०० ते २.०० | भोजन व विश्रांती |
| दुपारी | : | २.१५ ते ३.०० | गीतमंच |
| सायंकाळी | : | ३.०० ते ४.३० | व्याख्यान सत्र १ व २ |
| | | ४.४५ ते ७.०० | चहा, मैदानी खेळ व गटचर्चा |
| रात्री | : | ८.१५ ते ९.३० | सामाजिक विचारमंथन व दैनदिनी लिखाण |
| | | ९.४५ ते ९.५५ | प्रार्थना व दीपमालवण |

वरील प्रमाणे नियोजन दररोजचे ठरलेले होते त्यानुसार योग्य ते नियोजन आमच्या टीम कडून केले गेले त्यामुळे हे शिबीर अतिशय यशस्वी झालेगावातील शिबिराचा जो उचित हेतू होता तो साध्या झाला आमच्या शिबिरातील सर्व ग्रामस्थांनी प्रत्येक कार्यक्रमात सहभाग नोंदविला व योग्य ते सहकार्य केले. स्वयंसेवकांचे येथील गावकर्यांनी विशेष कौतुक केले.



Created by Universal Document Converter

## विद्यार्थी विकास विभाग अहवाल

**डॉ.जी.जे.पावरा,** वि.वि.अधि.
**प्रा.ए.एन.भदाणे,** सहा.वि.वि.अधि.
**डॉ.एम.एन.पंजाबी,** महिला वि.वि. अधि.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यार्थी विकास विभाग आणि त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास विभागामार्फत पदवी–पदव्युत्तर, नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा. याकरिता सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शन आयोजित केले जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व कला गुणांना संधी मिळते, तसेच सांस्कृतिक कला जोपासली जावी असा प्रयत्न या विभागाद्वारे केला जात असतो. म्हणून शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग अंतर्गत आणि इतर महाविद्यालयात विविध उपक्रमात सहभागी झालेले विद्यार्थ्यांचा संक्षिप्त अहवाल पुढील प्रमाणे.

१) दिनांक ९ ऑगस्ट २०२३ रोजी जागतिक 'आदिवासी दिवस' क्रांती दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.पी.एस.सोनवणे यांनी मार्गदर्शन केले.

२) दिनांक १२ ऑगस्ट २०२३ रोजी 'युवा दिवस' साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

३) २९ ऑगस्ट २०२३ रोजी मा.कुलगुरू, प्रोफेसर व्ही.एल.माहेश्वरी सरांनी चंद्रयान–३ यशस्वी पणे उड्डाण केल्याबद्दल विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन केले.

४) दिनांक १ आक्टोबर २०२३ रोजी महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

५) दिनांक ७ ते ११ ऑक्टोंबर २०२३ रोजी युवारंग (युथ फेस्टिवल) २०२३–२४ मु.जे.महाविद्यालय



Created by Universal Document Converter

जळगांव येथे सहभाग.

१. अहिरे गौरव सतिष                  २. महाले योगेश्वरी कन्हैयालाल

३. बच्छाव राजनंदनी अमृत              ४. शिंदे सुशिला सुरेश

५. डॉ.के.डी.अहिरे                  ५. डॉ.जी.जे.पावरा

६) दिनांक १६ ऑक्टोंबर २०२३ रोजी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीमित्त 'वाचन प्रेरणा दिवस' साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

७) दिनांक १८ ऑक्टोंबर २०२३ रोजी अविष्कार २०२३-२४ आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालय शिरपूर येथे सहभाग.

१. देवरे हर्षिता प्रशांत                २) बोदडे प्रीथ्वी विकास

३. डॉ.जी.जे.पावरा

८) दिनांक २ डिसेंबर २०२३ रोजी जागतिक एड्स सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

९) दिनांक १८ व १९ जानेवारी २०२४ रोजी विद्यार्थीनी महाविद्यालय धुळे येथे विद्यापीठ स्तरीय पोस्टर सादरीकरण कार्यशाळेत सहभाग.

१. देवरे हर्षिता प्रशांत                २. बच्छाव राजनंदनी अमृत

३. भदाणे निकिता नवल                ४. अहिरे जितेंद्र प्रकाश

५. पाटील योगेश रावसाहेब              ६. बोरसे विशाल दिपक

१०) दिनांक २३ ते २५ फेब्रुवारी २०२४ रोजी सि.गो.पाटील महाविद्यालय, साक्री येथे श्रमसंस्कार व्यक्तिमत्व व नेतृत्व गुण विकास तीन दिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळेत सहभाग.

१. कुवर विशाल छगन                 २. राऊत सुमित शमुवेल



Created by Universal Document Converter

३. वळवी तुषार रामदास ४. अहिरे शितल गोविंदा

५. पाडवी शर्मिला आपसिंग ६. गांगुर्डे सुशिला सुरेश

११. दिनांक १२ जानेवारी २०२३ रोजी ग्रामीण रूग्णालय साक्री आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात निबध स्पर्धा (HIV Awareness) आणि व्याख्यान आयोजित करण्यात आले.

१. बोरसे मानसी चंद्रशेखर २. सैंदाणे मानसी नितीन

३. देवरे हर्षिता प्रशांत ४. पानपाटील कोमल विजय

५. कोठावदे साक्षी सुनिल ६. बोदडे प्रीथ्वी विकास

७. नांद्रे युक्ती संजय ८. बोरसे अस्मिता सुभाष

९. देवरे मानसी सुनिल

१२) दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्याख्यान विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

१३) दिनांक ५ ते ७ मार्च २०२४ रोजी विद्यापीठस्तरीय तीन दिवसीय साहस कार्यशाळा स्वर्गीय आण्णासाो.आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी येथे सहभागी विद्यार्थी

१. हर्षदा प्रशांत देवरे २. सुवर्णा भालचंद्र देसले

३. राजनंदनी अमृत बच्छाव ४. सागर संतोष पवार

५. मंगेश सुरेश सूर्यवंशी ६. गौरव सतिष अहिरे

१४) दिनांक १३ मार्च २०२४ रोजी मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सेमी कंडक्टर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी विद्यार्थी आणि प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

१५) दिनांक १६ ते १८ मार्च २०२४ रोजी प्रशाळा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे तीन दिवसीय आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा विकास कार्यशाळेत सहभाग.

१. सुमित बालाजी वळवी २. तुषार रामदास वळवी



Created by Universal Document Converter

३. आमिष पंड्या गवळी ४. नीलिमा पप्पू देशमुख

५. शर्मिला अपसिंग पाडवी ६. वैशाली सुरेश गांगुर्डे

१६) दिनांक १८ ते २१ मार्च २०२४ विद्यापीठस्तरीय तीन दिवस दिवसीय कला, गुण कौशल्य कार्यशाळा विद्यावर्धिनी सभेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे येथे सहभाग.

१. सुवर्णा भालचंद्र देसले २. जागृती सोनवणे

३. निकिता नरेंद्र पाटील ४. सागर संतोष पवार

५. हर्षल किशोर साळुंखे

१७) दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी भारतरत्न डॉ.बी.आर.आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ.के.बी.वाघ तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

१८) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील 'कमवा व शिका' योजना कार्यरत आहे. या योजनेमध्ये एकूण १३ विद्यार्थ्यांची विद्यापीठ मार्फत निवड करण्यात आली. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना रूपये ४६,२२०/- आर्थिक मोबदला दिला गेला.

१९) आर्थिक दृष्टया दुर्बल घटक आर्थिक सहाय्य योजना, अनाथ, दिव्यांग /अपंग आणि दारिद्रेषेखाली असलेल्या विद्यार्थ्यांची विद्यापीठामार्फत आर्थिक सहाय्य केले जाते. या योजनेत महाविद्यालयातील १८ विद्यार्थ्यांची विद्यापीठामार्फत निवड करण्यात आली. त्यांना रूपये ८२,०००/- आर्थिक सहाय्य मंजूर झाले आणि ते त्यांना संस्थेचे सचिव, मा.डॉ.मंगलाताई भास्कर देसले यांच्या हस्ते धनादेश वाटप करण्यात आले.

अशा प्रकारे विद्यार्थी विकास विभागाद्वारे वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले गेले. यासाठी त्यांना संस्थेचे सचिव, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, प्राचार्य,प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे अनमोल सहकार्य लाभते.



Created by Universal Document Converter

# युवती सभा अहवाल २०२३-२४

प्रा.डॉ.करूणा डी.अहिरे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात युवती सभेस मंजूर करण्यात आलेला कार्यक्रम ''पर्यावरण संरक्षण संवर्धन जनजागृती अभियान ''अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

दिनांक ०२/०९/२०२३ रोजी सायबर सिक्युरिटी या विषयावर कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्ता कुनिका खैरनार व दर्शन हिरे यांनी सायबर क्राईम, यांनी मोबाईल, इंस्टाग्राम, व्हाटसअप, फेसबुक व इंटरनेटच्या सर्व ॲप विषयी माहिती दिली. तसेच त्यांचे फायदे व नुकसान याविषयी देखील उदाहरणास माहिती दिली. कार्यक्रमात प्रसंगी विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारून सायबर सिक्युरिटी विषयी जाणून घेतले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी सोशल मिडिया विषयी घडणाऱ्या गुन्ह्यांचे अनेक उदाहरण देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमात आय. क्यू.एस.सी.प्रमुख प्राध्यापक डॉ.जहागीरदार साळुंके यांनी मोबाईलमुळे होणारे शारीरिक, मानसिक स्वास्थ याविषयी मार्गदर्शन केले. युवती सभा प्रमुख डॉ.करूणा अहिरे यांनी विद्यार्थीनींमध्ये आत्मविश्वास वाढवा यासाठी युवती सभा ही खुले व्यासपीठ महाविद्यालयात स्थापन केले आहे. त्या अंतर्गत होणाऱ्या विविध कार्यक्रमांचा लाभ विद्यार्थीनींनी घ्यावा असे ही नमूद केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ.ममता पंजाबी यांनी केले. महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

दिनांक ०३/०१/२०२४ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून पर्यावरण संरक्षण व संवर्धन जनजागृती अभियान या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रा.डॉ.कैलास वाघ यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले त्यांच्या जीवन कार्य संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करून पर्यावरण संरक्षण व संवर्धन या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी पर्यावरण संरक्षण व संवर्धन काळाजी गरज आहे हे विविध उदाहरणातून स्पष्ट केले. पर्यावरणात बदल घडवून आण्याकरिता झाडे लावणे, झाडे जगवे, महत्वाचे आहे व



Created by Universal Document Converter

वृक्षारोपणाचे महत्व सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण व व्यवस्थापन होणे काळाची गरज आहे. म्हणून पर्यावरण संरक्षण संवर्धन जनजागृती करणे, प्रदूषण रोखणे, वृक्ष लागवड करणे, त्यांचे महत्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ.विजय देसले यांनी केले. प्रा.डॉ.करूणा अहिरे यांनी आभार व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय युवती सभा यांच्या विद्यमाने दि.१२/०१/२०२४ शुक्रवार रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद या महान विभूतींच्या जयंतीचे औचित्य साधून पर्यावरण संरक्षण संवर्धन जनजागृती अभियान या विषयावर कार्यक्रम राबविण्यात आला कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्याता प्रतिभा चौरे मॅडम यांनी राजमाता जिजाऊंनी पर्यावरणात गड किल्ल्यांचा कसा उपयोग होतो यांचे महत्व स्पष्ट केले. मॅडमांनी आपल्या व्याख्यानात जल, जंगल, जमीन, जनावर या पर्यावरणातील प्रमुख घटकांचे महत्व स्पष्ट केले. विविध गीतांच्या माध्यमातून त्यांनी पर्यावरणाचा समतोल कसा राखला जाईल याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सांस्कृतिक मंडळाचे पमुख प्रा.डॉ.विजय देसले यांनी राजमाता जिजाऊ यांच्या स्वाभिमानी आत्मविश्वासू, वैज्ञानिक दृष्टिकोन, करूणा या गुणांविषयी सखोल मार्गदर्शन केले. बाल शिवराय ते छत्रपती शिवराय यांच्या जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान विविध उदाहरणातून स्पष्ट केले. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.पी.एस.सोनवणे सर यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त पर्यावरण संरक्षण संवर्धन यात युवकांचे योगदान व राष्ट्रमाता जिजाऊ यांनी स्वराज्य थापनेसाठी केलेले प्रयत्न, पर्यावरण संरक्षणासाठी केलेले प्रयत्न याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवती सभाप्रमुख प्रा.डॉ.करूणा अहिरे यांनी केले. कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ प्रा.डॉ.वसुमती पाटील, एन.एस.एस.सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.कैलास वाघ, आय.क्यू.ए.सी.प्रमुख प्रा.डॉ. जहागीरदारसाळुंखे, विद्यार्थी विकास प्रमुख प्रा.डॉ.गुलाबसिंग पावरा हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा देसले, परिचय निहारिका देवरे, आभार प्रदर्शन दिया सोनवणे या महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.



Created by Universal Document Converter

दिनांक १२/०२/२०२४ सोमवार रोजी साडी डे कार्यक्रम साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी संस्कृती आणि सौंदर्य याची जपणूक रणारे वस्त्र म्हणजे साडी, जगभरातील महिलांनापरिधान करता येणारी करणारे वस्त्र म्हणजे साडी भारतीय संस्कृतीत साडीचे महत्व सांगणारे अनेक दाखले त्यांनी दिले पर्यावरण संवर्धन व संरक्षण या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात विद्यार्थीनीने नृत्य, गायन व अभिनय सादर केले कार्यक्रमात पूजा पवार, मयुरी पगारे, सुवर्णा देसले, जागृती गांगुर्डे या विद्यार्थीनींनी साडी विषय आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवती सभा प्रमुख प्रा.डॉ.करूणा अहिरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.ममता पंजाबी यांनी केले या कार्यक्रमात विज्ञान व कला शाखेतील सर्व विद्यार्थ्यांनी यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपले योगदान दिले.

३०/०२/२०२४ युवती सभा अंतर्गत पर्यावरण आणि आरोग्य या विषयावर वैद्यकीय अधिकारी सचिव नांद्रे यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे अध्यक्ष दादासो.पी.एस.सोनवणे यांरूया अनुमतीने कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ.वसुमती पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयातील विज्ञान व कला शाखेतील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी योगदान दिले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

दिनांक ०७/०३/२०२४ युवती सभा अंतर्गत जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य दादासो.पी.एस.सोनवणे यांच्या सहमतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉ.करूणा अहिरे यांनी केले. प्रा.डॉ.वसुमती पाटील यांनी पर्यावरण संरक्षण व संवर्धन या विषयावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले व इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.जहागीरदार साळुंके यांनी महिलांच्या शैक्षणिक विकास ज्योतीराव फुले सारख्या महापुरूषाच्या योगदान संदर्भात सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमात इतिहास विभाग व सांस्कृतिक मंडळ प्रमुख प्रा.डॉ.विजय देसले उपस्थित होते. कार्यक्रमात कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ.ममता पंजाबी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.



Created by Universal Document Converter

# सांस्कृतिक विभाग अहवाल

**प्रा.डॉ.विजय कौतिकराव देसले**

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ चा सांस्कृतीक विभागाचा अहवाल सादर करीत असतांना मला मनसवी आनंद होता आहे. या शैक्षणिक वर्षानी सांस्कृतीक विभागामार्फत अनेक नाविण्यपुर्ण उपक्रम राबविण्यात आलेत. याचा उहापोह यातील प्रमाणे करता येईल.

दिनांक २६ जुने रोजी राजर्षी शाहु महाराज जयंती व सामाजिक न्याय दिवस साजरा करण्यात आला त्या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.विनय देसले यांनी केले तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे होते. तर प्रा.डॉ.कैलास वाघ यांनी आभारमानण्याचे काम केले याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षण शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दि. ३ जुलै २०२३ रोजी महाविद्यालयात नॅक कमिटी येण्याच्या पुर्व संधेला सांस्कृतीक कार्यक्रमाची पुर्व तयारी करण्यात आली त्यासाठी प्रा.डॉ.मनिषा पाटीलचे मार्गदर्शन लाभले.

दि.०३/०१/२०२४ रोजी सावित्रीबाई फुले जयंती व बालीका दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.पी.एन.सोनवणे होते प्रमुख वक्ते म्हणून डॉ.कैलास वाघ लाभले होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.विजय देसले यांनी केले  आभार प्रदर्शन डॉ.दिनेश माळी यांनी केले.

दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात राष्ट्र संत गाडगे महाराज आणि मतदान जागृती अभियांनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाकरीत महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक २५/०२/२०२४ रोजी सांस्कृतीक कार्यक्रमा अंतर्गत महाविद्यालयाची कला विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना संगीत, नृत्य, पधनाटय यांचा सराव करून घेण्यात आला.

